एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्था

# Activity Report

## FY 2022 – 23

## EK KSHAN ANANDACHA



# संस्थचे प्रकल्प

झोपडपट्टी भागातील समस्यांचा विचार करता समस्या अनेक आहेत. शिक्षणाचा आभाव, व्यसनाधीनता, अस्वच्छता, आरोग्य, आर्थिक अशा अनेक समस्या आहेत. एवढ्या समस्यांवर काम करणे सुरुवातीला अशक्य असे होते. संस्थेमार्फत वस्तीचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षण करत असताना असे लक्षात आले कि वस्तीतील समस्यांचा अप्रत्यक्षपणे प्रभाव हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत होता. या सर्वांचा विचार करून संस्थेमार्फत वस्तीमध्ये प्रामुख्याने अभ्यासिका प्रकल्प सुरु करण्यात आला. अभ्यासिका प्रकल्पाच्या माध्यमातून त्याला इतर प्रकल्पांची जोड देण्यात आली.





**2000+**
**Students Reached**

# अभ्यासिका प्रकल्प

एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्था 2018 पासून अप्पर येथील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी कार्यरत आहे. या संस्थेचे काम प्रामुख्याने शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण आणि महिला सबलीकरण या क्षेत्रात चालते. वस्तीत काम सुरु करताना आलेल्या अनुभवातून तसेच 500 कुटुंबांच्या सर्वेक्षणातून अस निदर्शनास आले कि, विद्यार्थ्यांना शाळेमध्ये शिकवत असलेल्या अभ्यासक्रमामध्ये अडचणी येत आहेत, आणि सदर अडचणींचे निवारण तत्क्षणी न झाल्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातील आवड कमी होऊन ते शाळा सोडण्याच्या मानसिकतेला पोहचतात (Drop Out). शिक्षण पूर्णपणे बंद झाल्यास अनेक अनैतिक सवयींना बळी पडण्याचे प्रमाण वाढते, तर मुलींच्या बाबतीत लवकर लग्न होतात. हे प्रमाण कमी व्हावे अथवा आत्ता माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थांनी शाळा सोडू नये यासाठी संस्थेमार्फत 2018 पासून ‘अभ्यासिका प्रकल्प’ वस्तीतील विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आला. या उपक्रमांतर्गत इयत्ता ३ री ते १० वी पर्यंत च्या विद्यार्थ्यांसाठी दररोज batch नुसार शिकवणी घेतली जाते, ज्यामध्ये त्या वर्गात असलेल्या व इतर सर्व अडचणींचे निवारण केले जाते त्याचप्रमाणे त्यांच्याकडून सराव करून घेतला जातो. केवळ घोकमपट्टी न करता त्यांना त्या विषयातील गाभा समजेल यावर विशेष लक्ष असते. अभ्यासिका प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला पूरक असे अनेक उपक्रम घेतले जातात.

अभ्यासासोबतच मुलांना अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्या वाचनातून प्रेरणा मिळावी या उद्देशाने संस्थेमार्फत वस्तीतील मुलांसाठी प्रत्येक आठवड्यातील शनिवार व रविवार वाचन कट्टा हा उपक्रम सुरु आहे. या उपक्रमात वस्तीतील मुले आनंदाने सहभागी होतात. यामुळे मुलांच्या वाचनात सकारात्मक असे बदल घडून आलेले दिसून येतात. यामध्ये मुलांना वाचानायोग्य अशी ऐतिहासिक, बोधकथा, प्रेरणादायी पुस्तके उपलब्ध आहेत. उन्हाळयाच्या सुट्टीत हा उपक्रम रोज सुरु ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत आणि त्याविषयी विविध उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात येणार आहे.

# अभ्यासिका प्रकल्पाचा झालेला परिणाम















विद्यार्थी आनंदाने शिकू लागली आहेत. अभ्यासाची आवड निर्माण होण्यास मदत

भाषा या विषयातील वाचन, लेखन सुधारण्यास मदत. विद्यार्थी स्वतःचा अभ्यास स्वतः करत आहेत

गणित या विषयावर जास्तीत जास्त भर दिल्यामुळे मुले गणित हा विषय आवडीने शिकू लागली

दिवसभर अभ्यासिकेत मुले असल्यामुळे मुलांचा स्क्रेनिंग टाइम कमी होण्यास मदत झाली आहे

कुटुंबावरील आर्थिक भार कमी होण्यास मदत

अभ्यासिकेमुळे संपूर्ण कुटुंब संस्थेसोबत जोडले गेले

# अभ्यासिका प्रकल्पाच्या माध्यमातून घेण्यात आलेला अभ्यास

| अभ्यास | खेळ | गाणी / गोष्टी |
|---|---|---|
| • विद्यार्थ्यांचे मराठीचे वाचन सुधारावे यासाठी उजळणीचा वापर करून वाचन घेण्यात येत आहे.<br>• गणित या विषयात परीक्वता यावी यासाठी बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यावर अधिक भर देण्यात येत आहे.<br>• इयत्तेनुसार अभ्यास घेण्यात येत आहे. | • राम रावण<br>• स्व-ओळख होण्यासाठी पासिंग द पार्सल गेम | • आम्ही गड्या डोंगरचे राहणार चाकर शिवबाचे होणार....<br>• हीच आमची प्रार्थना हेच आमचे मागणे...<br>• तू बुद्धी दे तू तेज दे..... |

| अभ्यास | गाणी व गोष्टी | खेळ |
|---|---|---|
| ➢ **मराठी- वाचन, निबंध लेखन, पत्र लेखन, समानार्थी शब्द, व्याकरण**<br>➢ **गणित- Financial Planning, लासावी मसावी, पाढे पाठांतर, बेरीज व वजाबाकी, एक चालीय समीकरणे**<br>➢ **English - Writing skill, Reading, A-Z, story listening** | • टाकर जरा नजर दूरवर मैतरा....<br>• चला र उठा र त्रिकाल संध्या करा र....<br>• आम्ही गड्या डोंगर च राहणार चाकर शिवबाचे होणार.....<br>• गोष्ट – दोन मित्र, हुशार माणूस | • कान-गोष्टी<br>• आम्ही चाललो आमुच्या गावा आमुचा राम राम घ्यावा<br>• धावत येवून काठी पकडणे<br>• लाठी काठी |

# अभ्यासिका प्रकल्पाच्या माध्यमातून घेण्यात आलेले विशेष उपक्रम

- The plan नाटक
- अभ्यास सहल - स्वामी विवेकानंद बाग
- अभ्यास सहल - तळजाई टेकडी
- उजळती वाट- व्यक्तिमत्व विकास
- आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून
- उपक्रम- पालखी सोहळा आनंदाचा सोहळा
- मेहंदी स्पर्धा
- निसर्ग रक्षाबंधन
- स्वातंत्र्यदिन
- सुंदर माझी प्रतिज्ञा
- गणपती रंगवणे
- शिक्षक दिन
- सामाजिक वाढदिवस
- कन्या पूजन
- वाचन प्रेरणा दिन
- पाटी पूजन व दिवाळी
- जिजाऊ जयंती
- मेहंदी व हेअर कट

- प्रजासत्ताक दिन
- सदरक्षणाय
- शिवजयंती व्याख्यान
- सायन्स पार्क पुणे विद्यापीठ भेट
- Good touch bad touch
- विज्ञान प्रदर्शन
- आनंददायी उन्हाळी शिबीर
- फॅब्रिक पेंटिंग
- किचेन तयार करणे
- ओरिगामी
- पॉट पेंटिंग, पेन पॉट पेंटिंग
- कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिन
- पुनवा बाल शिबीर
- क्षेत्र भेट
- गृहभेट व शुभेच्छा
- रंगेबिरंगी अभ्यासिका
- आनंदी वारी आषाढी वारी
- एक राखी आपल्या पोलीस भगिनीसाठी
- Flag making Activity






विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा त्याचप्रमाणे संपूर्ण वस्तीत एकोप्याची भावना निर्माण व्हावी यासाठी संस्थेमार्फत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.








मेहंदी स्पर्धा प्रमुख पाहुणे व पर्यवेक्षक म्हणून डॉ.उज्वला हातागले उपस्थित होत्या.



**सुंदर माझी प्रतिज्ञा या उपक्रमात वस्तीतील महिला, विद्यार्थी व शाळा सहभागी झाल्या होत्या.**













**भारतीय संस्कृती** मधे स्त्रीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नवरात्र मधे देवीची पूजा करण्यात येते याच नऊ दिवसांमधील एक दिवस कन्या पूजन करण्यात येते. देवीच्या आठव्या माळेच्या दिवशी **बाहेती परिवाराने** संस्थेतील मुलींचे कन्या पूजन केले. कान्यापुजानासोबत त्यांनी मुलींसोबत संवाद देखील साधला आणि त्यांना भेट म्हणून शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी पाउच भेट म्हणून दिले

# वाचन प्रेरणा दिवस

वाचन प्रेरणा दिवस निमित्त दत्तात्रय फाउंडेशनच्या संस्थापिका गायत्री ताई यांनी एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेला भेट दिली. गायत्री ताई यांनी मुलांसोबत संवाद साधला. संवादात स्वामी विवेकनंद यांच्या वाचनाची गती किती होती याबद्दल सांगितले.



स्वामी विवेकानंद यांच्या वाचनाची गती १ मिनटाला जवळ जवळ १००० शब्द वाचण्याचा होता. आपल्याला जर वाचन सुधारायचे असेल तर आपल्याला रोज वाचले पाहिजे यासाठी लहान मुलांना वाचण्यायोग्य पुस्तके भेट म्हणून दिली. तसेच त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुलांना सांगितले की रोज लिहिले पाहिजे जर तुम्ही तुमचे अनुभव नवीन नवीन कथा लिहिल्या तर आपण नक्कीच मासिक तयार करुयात.




वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून धैर्य सामाजिक संस्थेचे संचालक ओमकार दादा यांनी एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी मुलांशी संवाद साधताना वाचन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच त्यांनी मुलांना भेट म्हणून वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी पुस्तकांचा संच भेट म्हणून दिला. ओमकार दादा हे अत्यंत मनमिळावू व्यक्तिमत्व असून ते अनेक संस्थांना नेहमी मार्गदर्शन करत असतात. मर्दानी खेळात ते खुप तरबेज आहेत. त्यांच्या या कार्याला मनापासून शुभेच्छा.















## राजमाता जिजाऊ जयंती निमित्त निबंध लेखन स्पर्धा

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला फ्लॅग मेकिंग अक्टिविटी संस्थेत घेण्यात आली. ही ॲक्टिविटी स्वयंसेवक श्लोक याने घेतली. यावेळी मुलांना देशाचा तिरंगा याबद्दल माहिती सांगितली. तिरंगा बनवताना मुलांना खुप आनंद झाला. आणि विशेष म्हणजे हा तिरंगा पर्यावरण पूरक कागदी असा आहे. **तिरंगा कागदी असून प्रजासत्ताक दिनाला मुलांनी स्वत: बनवलेला तिरंगा घरावर लावण्यासाठी वापरला. प्लास्टिकचा तिरंगा वापरून झाल्यावर काय करायचे हे अनेकांना प्रश्न पडतो. कागदी तिरंगा वापरल्यामुळे पर्यावरणाला कोणतीही हानी पोहचत नाही व त्याचे लवकर विघटन होते.**






**२६ जानेवारी निमित्त पुनवा संस्थेच्या प्रमुख स्वाती ताई कार्यक्रमाला उपस्थित होत्या.**



# विज्ञान प्रदर्शन

## विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले विज्ञान प्रदर्शन



वेगवेगळे प्रयोग करून बघायला विद्यार्थ्यांना खुप आवडते. पण तसे बघायला गेले तर विज्ञान हा विषय अवघड वाटणारा विषय परंतु त्याला कृतीची जोड दिली तर तो सोप्पा वाटू लागतो. मग विद्यार्थ्यांनी ठरवले आपण विज्ञान प्रदर्शन ठेवूयात. दिवस ठरला आणि विद्यार्थी लागले तयारीला. या तयारीसाठी स्वयंसेवक श्रद्धा ताईचे मार्गदर्शन खुप मोलाचे ठरले. कारण फक्त प्रयोग नव्हते करायचे तर त्यात वैज्ञानिक दृष्टिकोन सांगून सादर देखील करायचे होते. विज्ञान प्रदर्शनाची सर्व पूर्वतयारी विद्यार्थ्यांनी केली. विद्यार्थी शुभम व विजया यांनी प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रयोग पाहिले व प्रदर्शनाच्या एक दिवस आधी सर्वांना प्रयोग मंडणीसाठी क्रमांक दिले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मनपा शाळेचे शिक्षक मा.श्री. कवी गोपाळ कांबळे सर उपस्थित होते. त्यांचे स्वागत शिक्षिका सोनाली ताई यांनी केले. गौतम कांबळे सरांनी विद्यार्थ्यांना खुप छान असे मार्गदर्शन केले. त्यांच्या जीवनातील प्रसंग त्यांनी सांगितले. यानंतर एक एक विद्यार्थ्यांचे प्रयोग सादरीकरण सरांनी पाहिले. सरांनाही विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयोगाचे विशेष कौतुक वाटले. त्यांनी सांगितले येवढ्या लहान जागेत आणि वस्तीत असे विज्ञान प्रदर्शन होऊ शकते तर अशा प्रकारचे विज्ञान प्रदर्शन आपण बाहेर मोठ्या प्रमाणावर घेवूयात. या विज्ञान प्रदर्शनाला वस्तीतील नागरिक, पालक, विश्वकर्मा शाळेतील विद्यार्थी यांनी भेट दिली.



प्रमुख पाहुणे मा.गौतम कांबळे सर त्याचप्रमाणे वस्तीतील नागरिकांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट दिली



# पर्यावरण प्रकल्प




**38**
**Schools**

**3500+**
**Students Reached**

प्लास्टिक कचरा हा संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या आहे. त्याचे जर व्यवस्थापन व्यवस्थित नाही केले तर आपल्याला त्याचे खूप सारे परिणाम दिसून येतील. आपण जर सद्यस्थितीला पाहिले तर सर्वात जास्त कचरा हा प्लास्टिकचा दिसून येतो. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करणे देखील अवघड आहे कारण प्लास्टिकचे विघटन होण्यास खूप सारा काळ लागतो. यासाठी शासनाने देखील प्रयत्न सुरु केले आहेत. सिंगल युज प्लास्टिक बंद केले आहे. शासनासोबतच संस्था, नागरिक, विद्यार्थी यांनीदेखील यामध्ये प्रत्यक्ष प्लास्टिक व्यवस्थापनात सहभागी झाले पाहिजे. आपल्या रत्नागिरी जिल्ह्याला सुंदर असा सागरी किनारा लाभला आहे. परंतु मानवाच्या अमानवी कृत्यांमुळे प्लास्टिक कचरा इकडे तिकडे फेकून दिल्यामुळे तो कचरा समुद्रात जातो आणि त्यामुळे आपली जी सागरी संपत्ती आहे त्यास हानी पोहचते. त्याचे दुष्परिणाम पर्यावरणावर झालेले दिसून येतात.
या उपक्रमांतर्गत पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन, आसमंत फाऊंडेशन, एक क्षण आनंदाचा, पर्यावरण संरक्षण गतीविधी आणि कमिन्स इंडिया फाऊंडेशनया संस्थांनी एकत्रितपणे प्लास्टिक जनजागृतीविषयी रत्नागिरी शहरातील विविध शाळा व कॉलेज मधे उपक्रम घ्यायचे योजिले होते. यानिमित्ताने रत्नागिरी शहरातील एकूण ११ महाविद्यालयांमध्ये प्लास्टिक कचरा जनजागृती सत्र व एकोब्रिक कार्यशाळा राबविण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी खूप सुंदर असा प्रतिसाद दिला. काही शाळांनी तर एकोब्रिकचा प्रकल्प विद्यार्थ्यांना करण्यास सांगितले. या जनजगृती सत्रात शिक्षक, विद्यार्थी, स्वयंसेवक त्याचप्रमाणे नागरिकांचा देखील यामध्ये सहभाग लाभला.

# प्लास्टिक कचरा जनजागृती सत्र रत्नागिरी

प्लास्टिक कचरा हा संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या आहे. त्याचे जर व्यवस्थापन व्यवस्थित नाही केले तर आपल्याला त्याचे खूप सारे परिणाम दिसून येतील. आपण जर सद्यस्थितीला पाहिले तर सर्वात जास्त कचरा हा प्लास्टिकचा दिसून येतो. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करणे देखील अवघड आहे कारण प्लास्टिकचे विघटन होण्यास खूप सारा काळ लागतो. यासाठी शासनाने देखील प्रयत्न सुरु केले आहेत. सिंगल युज प्लास्टिक बंद केले आहे. शासनासोबतच संस्था, नागरिक, विद्यार्थी यांनीदेखील यामध्ये प्रत्यक्ष प्लास्टिक व्यवस्थापनात सहभागी झाले पाहिजे. आपल्या रत्नागिरी जिल्ह्याला सुंदर असा सागरी किनारा लाभला आहे. परंतु मानवाच्या अमानवी कृत्यांमुळे प्लास्टिक कचरा इकडे तिकडे फेकून दिल्यामुळे तो कचरा समुद्रात जातो आणि त्यामुळे आपली जी सागरी संपत्ती आहे त्यास हानी पोहचते. त्याचे दुष्परिणाम पर्यावरणावर झालेले दिसून येतात.

या उपक्रमांतर्गत पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन, आसमंत फाऊंडेशन, एक क्षण आनंदाचा, पर्यावरण संरक्षण गतीविधी आणि कमिन्स इंडिया फाऊंडेशनया संस्थांनी एकत्रितपणे प्लास्टिक जनजागृतीविषयी रत्नागिरी शहरातील विविध शाळा व कॉलेज मधे उपक्रम घ्यायचे योजिले होते. यानिमित्ताने रत्नागिरी शहरातील एकूण १५ महाविद्यालयांमध्ये प्लास्टिक कचरा जनजागृती सत्र व एकोब्रिक कार्यशाळा राबविण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी खूप सुंदर असा प्रतिसाद दिला. काही शाळांनी तर एकोब्रिकचा प्रकल्प विद्यार्थ्यांना करण्यास सांगितले. या जनजगृती सत्रात शिक्षक, विद्यार्थी, स्वयंसेवक त्याचप्रमाणे नागरिकांचा देखील यामध्ये सहभाग लाभला.

### प्लास्टिक कचरा व्यवस्थापन सत्र व इकोब्रिक कार्यशाळा यांचा झालेला परिणाम

- शाळा कॉलेज मधे संपर्क
- प्लास्टिक कचरा जनजागृती होण्यास मदत
- इकोब्रिक करण्यास अत्यंत सोपे आणि सहज असल्यामुळे छोट्या छोट्या प्लास्टिकचे नियोजन होण्यास मदत ठरणार आहे.
- अनेक शाळांनी एकोब्रिक प्रकल्प विद्यार्थ्यांना करण्यास सांगितले.
- समुद्र किनारी प्रदर्शनास अनेक नागरिकांनी एकोब्रिक कार्यशाळेला भेट दिली.



# शाळा महाविद्यालये पर्यावरण जनजागृती सत्र


















# इ-कचरा व प्लास्टिक कचरा जनजागृती










२३ फेब्रुवारी संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त पेहेल या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्याच अनुषंगाने एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेत जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी मा. गणेश जी पाठक, मा. सचिन जी व मा. प्रभाकर जी राव हे उपस्थित होते. सचिनजी यांनी एकोब्रिक म्हणजे काय व ते कसे तयार करायचे याची माहिती सांगितली. प्लास्टिकचे छोटे तुकडे आपण प्लास्टिक बॉटल मध्ये जमा करू शकतो यामुळे पर्यावरण रक्षणास आपल्या सर्वांचा हातभार लागू शकतो. गणेश जी पाठक यांनी मुलांसोबत संवाद साधताना संस्कार याविषयी मार्गदर्शन केले. मुलांकडून आम्ही गड्या डोंगरचे राहणार चाकर शिवबाचे होणार हे पद्य म्हणून घेतले व त्याचा अर्थदेखील मुलांना सांगितला.

# प्लास्टिक कचरा जनजागृती कार्यशाळा






एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्था, तेजस्वी फौंडेशन, स्पार्क यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व इकोब्रिक कार्यशाळा यांसंदर्भात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्लास्टिक कचरा हि सर्वात जास्त भेडसावणारी समस्या आहे. याचे योग्य असे नियोजन करून त्याचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्थितीला एकट्या पुणे शहरात ४०० टन प्लास्टिक कचरा तयार होत आहे आणि त्याचे परिणाम देखील घातक आहेत. प्लास्टिक हा प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. जर यासंदर्भात जनजागृती नाही केली तर याचे परिणाम आरोग्य व पर्यावरण यांवर होणार आहेत.

चर्चासत्रातील मुद्दे खालीलप्रमाणे -

- प्लास्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम
- प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन
- या चर्चा सत्रासाठी सानिका पुकळे, छाया भगत, मुकुंद काळे, सोनाली महामुनी, अभिजित वीर राधा पाटील, आदित्य लोंढे उपस्थित होते.

- येत्या वर्षभरात एकूण १० शाळा, ५ कॉलेज व सोसायटी यामध्ये प्लास्टिक कचरा जनजागृती व एकोब्रिक कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येकाने आपल्या आपल्या परिसरात जनजागृती अभियान राबवावे यावार चर्चा करण्यात आली.



# वृक्षारोपण

एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्था २०१९ पासून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण व महिला सबलीकरण या विषयांत काम करत आहे.



संस्थेच्या सुरुवातीपासूनच पर्यावरण या विषयावर ठोस असे काम करण्याचे योजिले होते. पर्यावरण संरक्षणासाठी पुणे शहरातील शाळांमध्ये प्लास्टिक कचरा जनजागृती सत्र घेण्यात आले. सासवड येथील गुरोळी हे गाव पर्यावरणदृष्ट्या हरित करण्याचे ठरविण्यात आले. यासाठी गावात मागील ४ वर्षांपासून विविध उपक्रम यामध्ये वृक्षारोपण, जनजागृती सत्र व गाव स्वच्छता मोहीम घेण्यात आली. सप्टेंबर २०२३ यादिवशी सासवड येथील गुरोळी गावात वृक्षारोपण शिबीर घेण्यात आले.



या शिबिराला पुणे Air Force शाळेतील NCC युनिट चे एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले होते त्याचप्रमाणे गावातील शाळेतील विद्यार्थी, नागरिक व तरुण मंडळ देखील सहभागी झाले होते. या शिबिरासाठी एक क्षण आनंदाचे गावातील सदस्य ओमकार भोसले यांनी खूप छान अशी व्यवस्था केली होती याबद्दल त्यांचे मनापासून आभार.



# महिला सबलीकरण



सहयोग सेतूच्या सर्व दात्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग लक्षणीय आहे. त्यामुळे आमचा नेहमीच प्रयत्न असतो की महिलांकडून प्रोत्साहनरुपी मदत महिलांना किंवा महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांना मिळावी. त्यासाठी आम्ही विविध उपक्रम राबवतो, जसे की एकल पालकांच्या मुलींना शैक्षणिक साहाय्य, शेतकऱ्यांच्या मुलींचे कन्यादान, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पाठबळ इत्यादी. अप्पर डेपो भागातील वस्ती मध्ये काम करणाऱ्या एक क्षण आनंदाचा ह्या संस्थेच्या अक्षय भोईटे सरांकडून तेथील एका ताईंना स्वतःचे घरगुती ब्युटीपार्लर सुरु करायचे आहे असे कळाले आणि त्यासाठीच्या वस्तूंसाठी लागणारे भांडवल हा त्यांचा प्रश्न होता. आम्ही त्या ताईंची भेट घेतली, त्यांच्यातील आत्मविश्वास आणि स्वतःच्या व्यवसायातून संसारासाठी आणि मुलांच्या शिक्षणासाठी नवऱ्याला हातभार लावायची धडपड दिसून आली. तसेच त्यांनी पार्लरसाठी आवश्यक वस्तू खरेदीसाठी लागणारे पैसे देखील दरमहा १०००/- रुपये प्रमाणे परत करण्याची तयारी दाखवली, ज्यातून आम्ही आणखी दुसऱ्या महिलेला प्रोत्साहन देऊ शकू. ही बाब आम्ही आमच्या नेहमीच्या आणि हक्काच्या दात्या सौ. वृषाली रासोटे ह्यांना सांगितली. त्यांनी स्वतः स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या मुलांना घडवले आहे. स्त्रियांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे किती महत्वाचे आहे ह्याची त्यांना कल्पना असल्याने त्या एका मिनिटांत ताईंना पार्लरसाठी लागणारे सर्व साहित्य घेऊन द्यायला तयार झाल्या. असा एकही उपक्रम झालेला नाही ज्यात सहयोग सेतूला रासोटे मॅडम कडून मदत मिळालेली नाही. उलट बऱ्याच वेळा दुसऱ्यांना संधी मिळावी म्हणून आम्हाला त्यांची मदत नाकारावी लागते. तरीही माझी थोडी तरी मदत घ्याच हा त्यांचा नेहमी हट्ट असतो. हा हट्ट म्हणजे त्यांचे सहयोग सेतू वरचे प्रेम आणि इतरांना जास्तीत जास्त मदत करण्यासाठी असलेली तगमग आहे. त्यांच्या मदतीमुळे आज एक ताई ब्युटीपार्लर चा व्यवसाय सुरू करून स्वतःच्या पायावर उभे राहू शकणार आहेत. वृषाली मॅडम चे सहयोग सेतू कडून विशेष आभार. आपल्या पैकी कुणाला अश्या उपक्रमात सहकार्य करायचे असल्यास किंवा आपल्या माहितीमध्ये कुठल्या ताईंना स्वतःच्या पायावर उभे राहण

- दर महिन्यातून एकदा महिला एकत्रीकरण करण्यात येते. जानेवारी महिन्यात महिला एकत्रीकरण करण्यात आले. यामध्ये मुलांचा दैनंदिन अभ्यास व घरात आपल्या मुलांसोबत पालकांचा कशाप्रकारे सुसंवाद असला पाहिजे यावर चर्चा करण्यात आली. मागील ६ महिन्यांपासून मुलांसाठी संस्थेत पौष्टिक खाऊ सुरु करण्यात आला होता. या उपक्रमामुळे मुलांमध्ये फरक जाणवत आहे का यावर चर्चा झाली.
- महिलांना बचतीची सवय लागावी व शिक्षण, आरोग्य या आपत्कालीन वेळेत अर्थ सहाय्य करणारे कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी आदर्श महिला बचत गटाची स्थापना करण्यात आली. यावेळी उपस्थित ज्या महिलांना बचत गटात सहभागी व्हायचे होते त्यांचा ठराव करण्यात आला तसेच अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.
- ज्या महिलांना रोजगार सुरु करायचा आहे आणि ज्यांना रोजगारासाठी मार्गदर्शन हवे आहे त्यांना संस्थेकडून मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य देण्यात येईल यावर चर्चा झाली.
- दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महिलांची बैठक होईल असे ठरविण्यात आले.






मकर संक्रांत म्हंटले कि सजणे सवरणे आलेच आणि मुलींसाठी व महिलांसाठी तर हा खास दिवस. याचाच विचार करून सेवाव्रत या संस्थेच्या माध्यमातून एक क्षण आनंदाचा संस्थेत मेहंदी व हेअर कट करण्याचे योजिले. मग काय संस्थेतील मुलींनी स्वतः पुढाकार घेवून सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले. सेवाव्रत या संस्थेचे एकूण १५ स्वयंसेवक या मेहंदी व हेअर कट या उपक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी प्रत्येक मुलीच्या हातावर मेहंदी, नेल पेंट व ज्यांना हेअर कट करायचा आहे त्यांचे हेअर कट केले. अशाप्रकारे मकर संक्रातीच्या आधी आनंद साजरा करायला मिळाला याचा आनंद सर्व मुलांना झाला



# महिला बैठक

महिलांची मासिक बैठक घेण्यात आली. संस्थेमार्फत प्रत्येक महिन्याला विविध विषयांवर आधारित वस्तीतील महिलांची बैठक घेण्यात येते. यामध्ये बचत गट, रोजगार, पौष्टिक खाऊ, महिलांच्या समस्या यावर चर्चा करण्यात येते आणि यासाठी त्या त्या विषयांतील तज्ञ व्यक्ती मार्गदर्शक म्हणून बोलविण्यात येतात.

मार्च महिन्यातील मासिक बैठकीला पुणे महानगरपालिका बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्रमांक ३७ मधील समूह संघटिका सौ. मनीषा पाजगुडे व समुपदेशक सौ. मनीषा शिंदे या आल्या होत्या. बैठकीची सुरुवात समूह संघटिका पाजगुडे यांनी केली. सुरुवातील बचत गट हा विषय घेण्यात आला. बचत गट यावर चर्चा करताना माहितीपर सांगण्यात आलेले मुद्दे खालीलप्रमाणे –

- बचत गट १५ महिलांचा असावा
- गटातील महिला जवळपास राहणाऱ्या एकमेकीना ओळखत असाव्यात
- सर्व महिलांच्या संमतीने गटाचे नाव ठरविण्यात यावे.
- सुरुवात करण्यासाठी महानगपालिका मध्ये एक दिवसाचे प्रशिक्षण असते.
- प्रशिक्षण पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र देण्यात येते.
- प्रमाणपत्र मिळाल्यावर बँक खाते सुरु करता येते.



समुपदेशक मनीषा शिंदे यांनी विद्यार्थी व महिला यांच्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या सुरु असलेल्या योजनांची व त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली. त्याचप्रमाणे त्यांनी कौंटूबिक वाद यावर महिलांसोबत संवाद साधला. गरज लागली तर समुपदेशकाची मदत व सल्ला घ्यावा. टोकाची भूमिका उचलू नये. तुम्हाला मदत करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात समुपदेशक उपलब्ध असतात. त्याचप्रमाणे वस्तीतील महिला व बालके यांच्यासाठी पुणे महानगरपालिका मार्फत सुरु असलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने दिव्यांग योजना, इयत्ता ९ वी व १० वी विद्यार्थ्यांसांठी योजना, विधवा महिला योजना यांची माहिती देण्यात आली.



# यशस्वी कथा

एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेचा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे कि महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे त्यांच्यामध्ये असलेले कौशल्य वापरून व्यवसाय सुरु करावा. त्यामुळे आमचा नेहमीच  प्रयत्न असतो की महिलांकडून प्रोत्साहनरुपी मदत महिलांना किंवा महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांना मिळावी. त्यासाठी आम्ही विविध उपक्रम राबविण्यात येतात जसे की एकल पालकांच्या मुलींना  शैक्षणिक साहाय्य, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पाठबळ इत्यादी. अप्पर डेपो भागातील वस्ती मध्ये राहणाऱ्या ताईंना स्वतःचे घरगुती ब्युटीपार्लर सुरु करायचे आहे असे कळाले आणि त्यासाठीच्या वस्तूंसाठी लागणारे भांडवल हा त्यांचा प्रश्न होता. आम्ही त्या ताईंची भेट घेतली, त्यांच्यातील आत्मविश्वास आणि स्वतःच्या व्यवसायातून संसारासाठी आणि मुलांच्या शिक्षणासाठी नवऱ्याला हातभार लावायची धडपड दिसून आली. त्यांनी पार्लरसाठी आवश्यक वस्तू खरेदीसाठी लागणारे पैसे देखील दरमहा १०००/- रुपये प्रमाणे परत करण्याची तयारी दाखवली, ज्यातून आम्ही आणखी दुसऱ्या महिलेला प्रोत्साहन देऊ शकू. स्त्रियांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे किती महत्वाचे आहे ह्याची कल्पना असल्याने संस्थेकडून ताईंना पार्लरसाठी लागणारे सर्व साहित्य देण्यात आले. पार्लरचा व्यवसाय सुरु करून आता सहा महिने झाले. ताईंचा व्यवसाय उत्तमरित्या सुरु आहे. त्यादेखील जिद्दीने आणि चिकाटीने व्यवसाय चालवत आहेत. वस्तीतील अनेकजण त्यांना पार्लरवाल्या ताई म्हणून ओळखू लागले आहेत आणि हि त्यांची नवीन ओळख त्यांना देखील त्यांच्या आनंदात भर टाकत आहे.







# आरोग्य प्रकल्प



| 6 Health Camp | 2 HB Camp | 700+ Beneficiaries |
|---|---|---|

## पौष्टिक खाऊ



- विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत तसेच त्यांनी नवीन नवीन गोष्टी शिकाव्यात आणि समाजात एक चांगले नागरिक बनावेत यासाठी प्रयत्न केले जातातच. परंतु हे प्रयत्न करत असताना असे लक्षात आले कि अनेक मुले मुली ह्या सतत आजारी पडत असतात. विद्यार्थ्यांचे आरोग्य व्यवस्थित नसेल तर त्यांचे अभ्यासात व इतर गोष्टीत लक्ष लागणारच नाही. त्यांचे आरोग्य सुधारावे यासाठी नवरात्री पासून एक क्षण आनंदाचा व सहयोग सेतू यांच्या सहकार्याने पुढील सहा महिन्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक खाऊ हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यामध्ये खजूर लाडू, राजगिर लाडू, शेंगदाणा लाडू, गुळ शेंगदाणे इ. खाऊ सुरु करण्यात आला आहे. ६० मुलांना रोज एक लाडू देण्यात येतो. ऑक्टोबर महिन्यात सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये मुलांचा रक्तगट, हिमोग्लोबिन तपासण्यात येणार आहे. यामध्ये जे विद्यार्थी जास्त अशक्त असतील त्यांना डॉक्टरांच्या सल्ल्याने पौष्टिक खाऊ देण्यात येणार आहे.

# आरोग्यम धनसंपदा



याचाच एक भाग या उपक्रमातील मुलांचे हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. हिमोग्लोबिन तपासणी अहवाल आल्यावर आरोग्य तपासणी होणार असून ज्या मुलांचे हिमोग्लोबिन कमी आहे ते वाढविण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्था व सहयोग सेतू यांच्या सहकार्याने वस्तीमध्ये राहणाऱ्या मुलांसाठी नवरात्री पासून पौष्टिक खाऊ प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आला आहे. यामध्ये मुलांना राजगिरा लाडू, शेंगदाना लाडू, खजूर लाडू देण्यात येतो. पुढील सहा महिने हा उपक्रम सुरु ठेवण्यात येणार असून यामध्ये मुलांच्या आरोग्यावर याचा परिणाम होतो का हे पाहण्यात येणार आहे.



# Sandwich making Activity

पोषण आहार अंतर्गत संस्थेत अगदी सहज सोप्या पद्धतीने सँडविच बनविण्याची प्रक्रिया संस्थेत पार पडली. स्वयंसेवक श्लोक याने विद्यार्थ्यांना आपला आहार कसा असावा आणि जीवनसत्वे यांच्याबद्दल माहिती सांगितली. सँडविच बनविण्याची प्रक्रिया सांगितली आणि प्रत्येक विद्यार्थ्याला सँडविच बनविण्यास सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः सँडविच बनविण्याचा आनंद घेतला आणि छान असे सँडविच विद्यार्थ्यांनी खाल्ले.





# लाठी काठी प्रशिक्षण

मे महिना म्हणजे शाळेला सुट्टी लागलेली असते, परीक्षेचा सर्व ताण संपलेला असतो. मग सुट्टीमध्ये काय करायचे असा प्रश्न अनेकवेळा पडतो. एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेने उन्हाळी सुट्टी साठी विद्यार्थ्यांसाठी आधीच उपक्रम ठरवलेले असतात.


मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी वेळोवेळी विशेष प्रयत्न केले जातात. मुलांना खेळाची आवड निर्माण व्हावी विशेषता मैदानी खेळ माहित असावेत ते खेळता यावेत त्याचप्रमाणे इतिहासातील पाउल खुणा व इतिहासातील युद्धकला माहित व्हाव्यात या हेतून मे महिन्यात वस्तीतील विद्यार्थ्यांसाठी लाठी काठी चे प्रशिक्षण १५ दिवसांसाठी आयोजित करण्यात आले होते. लाठी काठी हि युद्धकला शिवरायांच्या काळातील एक उत्तम अशी युद्धकला होती त्याचे जतन व्हावे हा उद्देश देखील यामागे आहे.

लाठी काठी मुळे मुलांचे स्व-रक्षण, शारीरिक हालचाल व व्यायाम होण्यास मदत होते. लाठी काठी उपक्रमासाठी विशेष सहकार्य लीना जैन mam Kradle to Krayonns preschool, प्रशिक्षक ओमकार उतेकर व सौ. तृप्ती उतेकर यांचे सहकार्य लाभले.









# आंतरराष्ट्रीय योग दिन



मुलांच्या बौद्धिक विकासासोबतच शारीरिक विकास देखील अत्यंत महत्वाचा आहे. हे संस्थेचे उद्दिष्ट देखील आहे. यासाठी संस्थेमार्फत जनजागृती पर उपक्रम राबविले जातात. २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून अभ्यासिकेत योग दिन साजरा करण्यात आला. यामध्ये योगाचे आपल्या जीवनातील महत्व आणि आपला रोजचा आहार कसा असावा याबद्दल माहिती देण्यात आली व सूर्यनमस्कार करण्यात आले.







वस्तीतील मुलांना संगणक हाताळता यावा तसेच पुढील शिक्षण घेत असताना संगणक वापरायला सोपे जावे. कारण आता प्रत्येक कार्यालयातील काम संगणक वर सुरू असते. संगणक शिवाय कार्यालयातील कामे पूर्ण होऊच शकत नाहीत. त्याचप्रमाणे अनेक मुलांना नोकऱ्या नाकारण्याचे कारण म्हणजे संगणक न येणे. आपल्या वस्तीतील मुले याबाबतीत मागे राहू नयेत. संगणकाची आणि त्यांची मैत्री आताच व्हावी यासाठी संस्थेमार्फत पुढील तीन महिन्यांसाठी वस्तीतील मुलांसाठी संगणक प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. संगणक प्रशिक्षण सुरू करताना अनेक अडचणी आल्या आणि आताही येत आहेत. काही वस्तू कमी पडत आहेत तरीही मुलांचा उत्साह पाहता त्यावरही मात करत संगणक प्रशिक्षण सुरू आहे. आपणही या प्रशिक्षणासाठी हातभार लावावा ही आपणास विनंती.

# यशस्वी कथा

## अभ्यासिका प्रकल्प :- शुभम शिंदे

माझे नाव शुभम शिंदे मी इयत्ता सहावी मध्ये शिकत आहे. मी मागील एक वर्षापासून एक क्षण आनंदाचा या अभ्यासिकेत येतो आहे. इथे येण्याआधी कोरोना सुरु झाल्यापासून मला काहीच अभ्यास करू नव्हता वाटत. मी शाळा पण सोडून दिली होती. उन्हाळ्यात अभ्यासिकेत येवून बसायला लागलो तेव्हा मला सरांनी माझ्या मागे लागून लागून शाळेत प्रवेश घेण्यास सांगितले. मला याआधी मराठी लिहिता वाचता देखील येत नव्हते. इथे आल्यापासून मला आता मराठी वाचता येवू लागले आहे. आमच्या अभ्यासिकेत विविध कार्यक्रम होत असल्यामुळे आणि सर त्या कार्यक्रमांची जबाबदारी माझ्यावर देत असतात त्यामुळे आता मी अभ्यासिकेत कार्यक्रम आयोजित करत असतो. सर जी गाणी पद्य आम्हाला शिकवतात ते मी आमच्या वस्तीतील अंगणवाडी मधील लहान मुलांना सुद्धा शिकवतो. संस्थेने आमच्या साठी पौष्टिक खाऊ सुरु केला आहे. तो माझ्यासाठीच सुरु केला आहे असे मला वाटते. कारण माझे वजन कमी आहे. धन्यवाद

## अभ्यासिका प्रकल्प :- विश्वजित सरगर

विद्यार्थी विश्वजीत सरगर मागील दोन वर्षापासून एक क्षण आनंदाचा सामाजिक संस्थेतील अभ्यासिकेत येत आहे. आला तेव्हा अभ्यासाचा प्रचंड असा कंटाळा. घरून बोलावून आणावे लागायचे. लिहिता वाचता एवढे ठीक येत नव्हते. सुरुवातीला त्याला अभ्यास न देता चित्र, गाणी, गोष्टी, गप्पा आणि त्यानंतर अभ्यास अशी त्याच्याबाबत प्रयोग केला. आता त्याला मराठी वाचता व लिहिता येवू लागले आणि आता तो स्वताहून न कंटाळा करता अभ्यासिकेत येत आहे. त्याची अभ्यासातील प्रगती पाहून त्याच्या शाळेतील मुख्याध्यापकांनी त्याला बोलावून घेतले आणि त्याला विचारले बाहेर कुठे क्लास लावला आहेस का तर तो बोलला नाही संस्थेत अभ्यास करायला जातो.

इयत्ता १० वी म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाचा असा टप्पा मानला जातो. १० वी नंतर पुढील करिअर निवडता येते. मागील ४ वर्षांपासून वस्तीतील विद्यार्थ्यांसाठी काम करत असताना अनेक अडचणी आणि चांगले देखील प्रसंग आले. यावर्षी संस्थेच्या अभ्यासिकेतील दहावीची पहिलीच batch. वर्षाच्या सुरुवातीला दहावीच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासिकेत योग्य असे नियोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या अभ्यासापासून त्यांना शिकविण्यापर्यंत नियोजन करण्यात आले होते. यामध्ये गणित, विज्ञान, इंग्रजी, मराठी, पत्रलेखन, जाहिरात लेखन, निबंध लेखन या विषयांचा प्रामुख्याने सराव करून घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थी व अभ्यासिकेतील शिक्षकांनी मनापासून घेतलेली मेहनत निकालानंतर बरच काही सांगून जाते. निकाल लागल्यावर सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेत संपर्क करून आपला निकाल सांगितला. निकालानंतर शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेट घेतली. विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. संवादात विद्यार्थी व पालक यांना पुढील करियरच्या संधी कशा मध्ये आहेत हे पाहून व आपल्या मुलांची आवड कशात आहे हे जाणून घेवून करिअर निवडावे. जर आर्थिक परिस्थितीमुळे अडचण येत असेल तर संस्थेकडून शक्य होईल तेवढी मदत करण्यात येईल परंतु कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबता कामा नये असे सांगण्यात आले.

# विशेष प्रतिक्रिया

**संस्था खूप छान काम करत आहे. फक्त अभ्यास न घेता अभ्यासाबरोबरच बाकीचे उपक्रम राबवत आहात आणि मुलेही तितक्याच उत्साहाने सहभागी होत आहेत खूप छान वाटलं संस्थेला भेट देवून. आमच्यासाठी हा वस्ती भेटीचा अनुभव खूप गरजेचा होता. ज्या गोष्टी फक्त पुस्तक वाचून समजन नाहीत त्या प्रत्यक्ष फिल्ड वर जाऊन समजतात आणि आम्हाला जसा वेळ भेटेल तेव्हा आम्ही येवूच पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !**

**वर्षाताई जाधव**

### स्नेहल मंडलेचा – संस्थेस भेट

"जन्मदिन- अनोख्या विचारांचा एक नवा जन्म"

तीक्षा चा बर्थडे याच वाढदिवस एक क्षण आनंदाचा या संस्थेत करण्याचे ठरविले. जी संस्था गरीब मुलांसाठी काम करते आणि त्यांच्याशी निगडित विविध उपक्रम राबवते. संस्थेत जाता क्षणीच सर्व मुलांनी टाळांच्या सुरात एकच जल्लोष सुरू केला आणि प्रथम तीक्षाला शुभेच्छा दिल्या.. खूप सुखद क्षण होता तो. मग झाल्या सुरू गप्पा गोष्टी. एका छोट्याशा मुलीने सुंदर कविता सादर केली, नंतर तिथल्या सरांनी संस्थेबद्दल माहिती सांगितली. ही संस्था सुरू करण्या पाठीमागचा उद्देश सांगितला. नंतर एका छोट्या मुलाने उठून तीक्षाला आधी शुभेच्छा दिल्या आणि त्यानंतर तो मुलगा जे बोलला ते ऐकून असं वाटलं की आपण मोठे झालो तरी विचारांनी यांच्यापेक्षा किती छोटे आहोत. तो असं म्हणाला "तुम्ही हा जो सेलिब्रेट करण्याचा विचार केलाय ते पाहून तीक्षा देखील पुढे जाऊन तिचा प्रत्येक वाढदिवस असाच साजरा करेल आणि समाजाला एक वेगळी दिशा दाखवेल अशी खात्री आहे माझी". म्हणजे आपण विचारही करू शकत नाही की मुलांमध्ये किती समंजसपणाचे विचार दडले आहेत. गरज आहे ती फक्त अशा मुलांना पुढे नेण्याची, त्यांच्या मधील सुप्त गुण जाणून घेण्याची आणि अगदी हेच काम ही संस्था अत्यंत मन लावून आणि चिकाटीने करत आहे. मग आम्ही सर्व कुटुंबाने देखील आमचे विचार त्या मुलांसमोर मांडले आणि त्यांना शालेय साहित्याची जी काही गरज होती ती गरज त्यांना देऊ केली.. त्यांच्यासोबत वेळ घालवला आणि त्यांना विश्वास दिला की किमान महिन्यातून तरी एकदा आम्ही त्यांना भेटू. त्यांचे आनंदी चेहरे पाहून आम्हीही अगदी समाधानाने घरी परतलो. हा अनुभव मी कधीच विसरू शकत नाही जो वेळ त्यांच्यासोबत घालवला तो जीवनातील माझ्या अविस्मरणीय क्षणांपैकी एक होता.

# विशेष प्रतिक्रिया

- मुलांची शिकण्याची इच्छा बघून खूप छान वाटलं. सगळी मुल भरपूर उत्साही आहेत. - आदित्य घोरपडे (स्वयंसेवक)
- मुलांचा प्रतिसाद खूपच उत्साही आहे. शाळेची सुट्टीच्या वेळी वेळेवर येणे व पूर्ण तास बसून शिकणे हा खूप मोठा प्रतिसाद आहे. तुम्ही सर्व जे सामाजिक काम करता ये खूप छान आहे. – प्रदीप रावल (स्वयंसेवक)
- सकाळचे सत्रात अक्षय सरांनी मुलांकडून खूप छान गणिताची activity घेतली. १ ते १०० अंक वापरून सम संख्या व विषम संख्या अगदी सोप्या पद्धतीने शिकवले. दुपारच्या सत्रात किचेन बनविण्याची activity मध्ये मुलांनी खूप असा एन्जोय केला. आम्हाला देखील किचेन बनविणे शिकता आले. – सौ. निशा माकदिया (RCM गुजराती शाळा शिक्षक)